दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शुक्रवार, 4 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 116 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर
# जिल्हाभरात कडकडीत बंद







परळी (प्रतिनिधी)

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे सुरू केलेल्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आज बीड जिल्ह्यासह परळी शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला.या बंदला व्यापारी, दुकानदार आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळपासूनच परळी शहरातील प्रमुख बाजारपेठा, दुकाने आणि व्यापारी आस्थापने बंद ठेवण्यात आल्याने नेहमी गजबजलेल्या बाजारपेठांमध्ये शुकशुकाट पाहायला मिळाला. मनोज जरांगे-पाटील यांच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली.कुणबी नोंदीच्या आधारे प्रमाणपत्र देणे, हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्रांचे वाटप करणे, तसेच इतर मागण्यांवर शासनाने ठोस कार्यवाही करावी, अशी भूमिका आंदोलकांनी घेतली आहे.

दरम्यान, बंदच्या पार्श्वभूमीवर परळी शहरात पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला असून, कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे. एकूणच, जरांगे-पाटील यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ बीड जिल्ह्यासह परळी शहरात पाळण्यात आलेल्या बंदमधून मराठा आरक्षणाच्या मागणीला जोरदार पाठिंबा मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# कोल्हापुरात ना. पंकजाताई मुंडे यांचं उत्स्फूर्त स्वागत

## कणेरी मठाच्या श्री सिध्दगिरी पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे थाटात लोकार्पण

पशुपालकांचे कल्याण हाच पशुवैद्यकीय शिक्षणाचा केंद्रबिंदू असावा ; विद्यार्थ्यांनी नोकरीपेक्षा उद्योजकतेला प्राधान्य देण्याचे केले आवाहन






**कोल्हापूर** | पशुवैद्यकीय विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान आणि संशोधनाचा थेट उपयोग पशुपालकांच्या जीवनमानात व उत्पन्नात वाढ करण्यासाठी झाला पाहिजे. पशुधनाचे आरोग्य, उत्पादकता आणि व्यवस्थापन सुधारल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळू शकते. त्यामुळे पशुवैद्यकीय महाविद्यालये केवळ पदवी देणाऱ्या संस्था न राहता पशुपालकांच्या समस्या सोडविणारे ज्ञान व तंत्रज्ञान केंद्र झाले पाहिजे अशी अपेक्षा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे व्यक्त केली.

कणेरी येथील श्री सिध्दगिरी मठाच्या श्री सिद्धगिरी पशुवैद्यकीय विज्ञान महाविद्यालयाचे लोकार्पण आज ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी आयोजित पशुपालक मेळाव्यास त्यांनी संबोधित केले. मठाधिपती काडसिद्धेश्वर स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला.

यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, पशुपालकांच्या दारापर्यंत आधुनिक पशुवैद्यकीय सेवा आणि तंत्रज्ञान पोहोचणे ही आजची गरज आहे." पशुधनातील आजारांचे वेळेवर निदान, प्रतिबंधात्मक लसीकरण, संतुलित पशुआहार, प्रजनन व्यवस्थापन आणि आधुनिक पशुपालन पद्धतींचा अवलंब यामुळे पशुपालकांच्या उत्पादन खर्चात बचत आणि उत्पन्नात वाढ होऊ शकते. पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील प्रत्यक्ष समस्या समजून घेऊन त्यावर स्थानिक पातळीवर व्यवहार्य उपाय विकसित करण्यासाठी संशोधन करावे. पदवी मिळाल्यानंतर केवळ शासकीय किंवा खासगी नोकरीच्या संधींच्या मागे न लागता स्वतः रोजगार निर्माण करणारे पशुवैद्यकीय उद्योजक घडणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. आधुनिक पशुवैद्यकीय क्लिनिक, निदान केंद्रे, मोबाईल पशुवैद्यकीय सेवा, डेअरी फार्म व्यवस्थापन, पशुखाद्य व पोषण सल्ला, प्रजनन सेवा, पशुधन विमा, डिजिटल सल्ला सेवा आणि दुग्धजन्य पदार्थांचे मूल्यवर्धन या क्षेत्रांत तरुण पशुवैद्यकांसाठी मोठ्या संधी असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामीण युवकांसोबतच महिलांना पशुपालन व दुग्धव्यवसायातील निर्णयप्रक्रियेत आणि आर्थिक उपक्रमांमध्ये अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास पशुविज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, आ. अमल महाडिक, अधिष्ठाता डॉ. शिरीष उपाध्ये, जि.प. अध्यक्ष प्रियाताई शिंदे, डॉ. के. एम. एल. पाठक आदी मान्यवर उपस्थित होते.

### ■ एसटीपी प्रकल्पाला भेट

या दौऱ्यात ना. पंकजाताई मुंडे यांनी कसबा बावडा येथील घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्राला (STP) भेट देऊन पाहणी केली व कामाचा आढावा घेतला.

पर्यावरण संरक्षण, नदी प्रदूषण नियंत्रण आणि शाश्वत विकासासाठी सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया होणे अत्यंत गरजेचे आहे. या प्रकल्पाची कार्यक्षमता अधिक सुधारण्यासाठी तसेच परिसरातील स्वच्छता व आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

### ■ जिल्हाधिकारी कार्यालयात घेतला आढावा

ना. पंकजाताई मुंडे जिल्हाधिकारी कार्यालयात पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना, प्रकल्प आणि उपाययोजनांबाबत सविस्तर आढावा बैठक घेतली.नदी प्रदूषण नियंत्रण, सांडपाणी व्यवस्थापन, पर्यावरणपूरक विकास आणि पशुधन संवर्धनासाठी आखलेल्या योजनांची गती वाढवून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश या वेळी संबंधित यंत्रणांना दिले. याप्रसंगी खा.धनंजय महाडिक, आ.अमल महाडिक, आ.राहुल आवाडे, आ.अशोक माने, शेतकरी नेते राजू शेट्टी आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# रामेश्वर (रुई) येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा

## किर्तन, दहीहंडी आणि महाप्रसादाचे आयोजन

लातूर | संपूर्ण जगात मानवतेचा आणि विश्वशांतीचा संदेश देणाऱ्या लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर (रुई) येथे ४ आणि ५ सप्टेंबर २०२६ रोजी भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळ्याच्या निमित्ताने किर्तन दहीहंडी आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. आहे तेव्हा रामेश्वर आणि पंचक्रोशीतील भाविक भक्तासह सर्व स्तरातील नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन संत श्री गोपाळ बुवा महाराज शुगर अँड अ‍ॅग्रो फूड इंडस्ट्रीजचे चेअरमन राजेश कराड यांनी केले आहे.



विश्वशांती केंद्र आळंदी, माईस् एमआयटी पुणे आणि समस्त रामेश्वर गावकरी मंडळ यांच्या वतीने भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्ताने रामेश्वर येथे २ दिवस अध्यात्मिक कार्यक्रम आयोजित केले असून त्यानुसार ४ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ९ वाजता ह. भ. प .अर्जुन महाराज लटपटे यांचे श्रीराम मंदिरात किर्तन होणार असून ५ सप्टेंबर २०२६ रोजी विश्वधर्मी मानवता तीर्थ भवन येथे सकाळी १० वाजता ह. भ. प. कृष्णा महाराज राऊत यांचे किर्तन होईल किर्तनानंतर दहीहंडीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर गावात दरवर्षी विविध उत्सव कार्यक्रम सर्व जाती-धर्मातील गावकरी एकत्रितपणे मोठ्या उत्साहात साजरे करतात. जगासमोर सर्वधर्म समभाव आणि मानवताधर्माची जपणूक करणाऱ्या रामेश्वर या गावाची नवी ओळख निर्माण झाली असून आदर्श आणि स्वयंपूर्ण गाव निर्माण करण्यासाठी रामेश्वर नगरीचे सुपुत्र विश्वधर्मीय प्रा. डॉ विश्वनाथजी कराड साहेब संकल्पनेतून प्रभू श्रीराम मंदिर, हजरत जैनुद्दीन चिस्ती दर्गा, तथागत गौतम बुद्ध विहार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती भवन, देशातील सर्वात मोठा लाल मातीचा कुस्ती आखाडा, ग्रामीण रुग्णालय, वाचनालय, सर्व धर्माचा संदेश देणारा श्रीराम रहीम मानवता सेतू, संत गोपाळबुवा महाराज यांचे अत्यंत सुंदर मंदिर यासह सर्व विविध वास्तु निर्माण करून धर्मसमभाव आणि विश्वबंधुत्वाचा एक नवा आदर्श निर्माण केला. जगाला शांतीचा संदेश देणाऱ्या देशातील सर्वात मोठ्या विश्वधर्मी मानवतातीर्थ भवनाची प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब संकल्पनेतून नुकतीच उभारणी करण्यात आली.

यावर्षीपासून यापुढे दरवर्षी श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव सोहळा रामेश्वर नगरीत साजरा केला जाणार आहे. तेव्हा रामेश्वर आणि परिसरातील भाविक भक्तासह सर्व स्तरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तन सेवेचा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आव्हान ज्येष्ठ मार्गदर्शक माजी सरपंच तुळशीरामअण्णा कराड, संत श्री गोपाळ बुवा महाराज शुगर अँड अ‍ॅग्रो फूड इंडस्ट्रीज चेअरमन राजेश कराड, पोलीस पाटील शरद पाटील, सरपंच सचिन कराड, कमाल राजेखाँ पटेल, दशरथ कराड यांच्यासह अनेकांनी केले आहे.

# कपड्यांचे 'लुकचेंजर'

बाजारातील ट्रेंड रोज बदलत असले, तरी काही गोष्टी कायम असतात. बांधणीच्या ओढण्या आणि लेंगिगचे दुकान, पारंपरिक साड्यांचं दुकान, कोल्हापुरी चपला विकणारा चांभार अशा दुकानांना लेटेस्ट कलेक्शनचा तसा फरक पडत नाही. पण याच दुकानांमध्ये एखादा फेरफटका मारला की, गरजेच्या वेळी सहज वापरता येणारा, लुकला ट्विस्ट देता येणारा एखादा प्रकार सहज सापडतो. उदाहरणच द्यायचं झालं तर नेहमीच्या काठपदराच्या साडीसोबत मॅचिंग ब्लाउज घालण्याऐवजी मल्टीकलर एम्ब्रॉयडरी केलेला ब्लाउज घालून पाहा. एखाद्या सलवारकमीजवर पलॅझो घालून पाहा. लुकमध्ये बदल लगेच जाणवतो. त्यामुळे असे एव्हरग्रीन प्रकार कपाटात असणं गरजेचं आहे.



## मल्टीकलर क्रॉप टॉप

क्रॉप टॉप तसा नुकताच ट्रेंडमध्ये आलेला प्रकार आहे. पण हे क्रॉप टॉप वेगवेगळ्या स्वरूपांत कित्येक कपड्यांसोबत सहज घालू शकता. एरवी क्रॉप टॉप जीन्स, स्कर्ट किंवा पलॅझोवर क्रॉप टॉप वापरला जातो. पण सणांच्या दिवसांसाठी एम्ब्रॉयडर, मल्टीकलर क्रॉप टॉप कपाटात असूद्यात. एखाद्या साध्याशा साडीसोबत ब्लाउज म्हणून तो सहज वापरता येतो. त्याशिवाय घेरेदार स्कर्टसोबत चोली म्हणून वापरता येईल. तुमच्या एरवीच्या कॉटन पँट किंवा पलॅझोला एम्ब्रॉयडर क्रॉप टॉपने वेगळा लुक देता येऊ शकतो.

## हटके केप्स

सुपर हिरोंच्या ड्रेसिंगमधील महत्त्वाचा भाग असलेले केप्स सध्या ट्रेंडमध्ये आहेत. अर्थात त्याचा लुक थोडासा वेगळा आहे. गळ्यातून घालता येणारा, साधारणपणे कमरेपर्यंतच्या उंचीचा हा केप असतो. एरवीच्या कप्तानचे हे पालटलेले रूप. नेहमीच्या ओढणीचा किंवा जॅकेटचा कंटाळा आला असेल, तर केप सहज वापरता येईल. कुर्त्यांपासून लेहेंगापर्यंत वेगवेगळ्या ड्रेसेससोबत हा सहज घालता येतो. बरं बहुतेकदा जॉर्जेट किंवा लेस कापडापासून बनलेला असल्याने तुमचा कुर्ता झाकला जात नाही.



## एक्स्ट्रा लॉंग दुपट्टा

दुपट्टा, ओढण्या हा तसा आपल्यासाठी नवा प्रकार नाही. विशेषतः सणाच्या दिवसात सलवार, अनारकलीसोबत ओढणी येतेच. सध्या लांब ओढण्यांचा ट्रेंड आहे आणि त्या एरवीही साध्या लुकला फेस्टिव्ह ट्विस्ट देण्यासाठी नक्कीच वापरू शकता. साध्या कुर्त्यांवर मल्टीकलर, नाजूक बॉर्डरची ओढणी घेऊन बघा. अगदी जीन्स कुर्त्यांवरसुद्धा छानशी ओढणी घेतल्यास लुक बदलतो. बांधणी, लेहरीयाच्या ओढण्या कधीच बाजारातून जात नाहीत. या ओढण्या तुम्ही वापरू शकता. ड्रेससोबत जॉर्जेटच्या सिंगल कलर ओढण्या येतात. त्या ड्रेसला साजेशा दिसतही नाहीत. अशा वेळी मल्टीकलर दुपट्टा तुम्हाला नक्कीच मदत करू शकतो. सध्या हँडिपट्र केलेले दुपट्टे बाजारात आले आहेत.

हाताने चित्रकला केल्यामुळे एक दुपट्टा दुसऱ्यापेक्षा पूर्ण वेगळा असतो. सिंपल कुर्त्यांसोबत हे दुपट्टे नक्कीच वापरू शकता. एखादा घेरेदार स्कर्ट आणि कुर्ता घातल्यास त्यावरही ओढणी घेता येईल. दुपट्ट्याच्या ड्रेपिंगच्या वेगवेगळ्या पद्धतीनेसुद्धा लुकमध्ये बदल जाणवतो.





## स्टायलिश जॅकेट

नवरात्रीच्या दिवसांमध्ये कच्छी वर्क केलेली जॅकेट्स आली. प्रदर्शनात किंवा फॅशन स्ट्रीटला फेरफटका मारल्यास वेगवेगळ्या पद्धतीचे एम्ब्रॉयडर जॅकेट्स नजरेस पडतात. कित्येकांवर स्टोनवर्क, पॅचवर्कसुद्धा केलेलं असत. असे जॅकेट तुम्ही ड्रेसवर ओढणीऐवजी सहज घालू शकता. नेहमीच्या सफेद शर्टवर एम्ब्रॉयडरी केलेले जॅकेट आणि जीन्स घातल्यास ऑफिसवेअरलासुद्धा फेस्टिव्ह लुक देता येऊ शकतो. सध्या इक्कत पट्रचे जॅकेट आले आहेत. हे दोन्ही बाजूने घालता येतात. एकाच जॅकेटमध्ये दोन प्रकार मिळून जातात. फंकी पट्रचे जॅकेटसुद्धा बाजारात आले आहेत. सध्याचा ट्रेंड आहे लांब जॅकेटचा. हे साडीवरसुद्धा वापरू शकता. प्रत्येक ड्रेससाठी वेगळा असा जॅकेटचा प्रकार घेण्याची गरज नसते. कपाटातील एखाददोन एम्ब्रॉयडरी केलेले जॅकेट तुम्ही वेगवेगळ्या ड्रेसेसवर सहज वापरू शकता.

## कुठे मिळतील?

दादर, परेल, बोरीवली, अंधेरी येथील खास सणासुदीच्या कपड्यांच्या खरेदीसाठी प्रसिद्ध असलेल्या बाजारपेठांमध्ये हे कपडे उपलब्ध आहेत. सध्या मॉल्समध्येही फेस्टिव्ह कलेक्शन्स लागली आहेत. तेथेही कपड्यांचे हे प्रकार उपलब्ध आहेत. याच्या किमती साधारणपणे ५०० रुपयांपासून सुरू होतात.

# सर्दी- खोकला बरं न होण्याचे कारण

खूप दिवस निघून गेले तरी सर्दी- खोकल्यात आराम नसल्याचे काही कारण असतात. जाणून घ्या ते कारणं:

- **ताण**- आपण ताण घेत असाल तर आपल्या शरीरात हायड्रोकॉर्टिझोन हार्मोन स्राव होत असतो. याने रोगप्रतिकार प्रणाली कमजोर होतं ज्यामुळे सर्दी लवकर बरी होत नाही.
- **स्प्रे**- आपण सर्दीचे औषध स्प्रेद्वारे घेत असाल तर यामुळेही नाकात सूज येते आणि सर्दी बरी होत नाही.
- **व्यायाम**- आरोग्यासाठी व्यायाम आवश्यक आहे परंतु सर्दी असताना अधिक व्यायाम केल्याने इम्यून सिस्टमवर प्रभाव पडतो.
- **एलर्जी**- जर आपल्याला माती, जनावरांचे फर, सुगंध, फूल व इतर अश्या काही वस्तूंने एलर्जी असल्या ते पोकळी निर्माण करतात आणि सर्दी टिकून राहते.
- **सायनुसायटिस**- जर आपण नाकात संक्रमण आणि सुजेमुळे सायनुसायटिसने पीडित असाल तर सर्दीच्या औषधांचा प्रभाव होत नसतो.
- **न्यूमोनिया**- जर आपण न्यूमोनियाने आजारी असाल तर नाक संक्रमण प्रती अधिक संवेदनशील होऊन जाते आणि सर्दी लवकर बरी होत नाही.

# सोलर पॅनेलची क्षमता वाढवून लाइट बिल झीरो करण्याचे ३ सोपे, प्रभावी उपाय

**सोलर पॅनेल बसवल्यानंतर त्याचा जास्तीत जास्त फायदा घेण्यासाठी योग्य देखभाल करणे अत्यंत आवश्यक आहे. पॅनेलला घाण, धूळ आणि सावलीपासून दूर ठेवून तुम्ही त्याची कार्यक्षमता वाढवू शकता. याशिवाय, बॅटरी बॅकअपमध्ये गुंतवणूक करणे आणि दुपारच्या वेळी भारी घरगुती उपकरणे वापरणे यासारख्या स्मार्ट सवयींमुळे तुमचे विजेचे बिल पूर्णपणे शून्य होऊ शकते. चला तर मग याविषयीची माहिती पुढे जाणून घेऊया.**



घर किंवा ऑफिसवर सोलर पॅनेल लावून वर्षानुवर्ष मोफत वीज मिळवायची असेल, तर त्याचे मेंटेनन्स महत्त्वाचे ठरते. सोलर पॅनेलची क्षमता सुधारण्यासाठी आणि वीज बिल कमी करण्यासाठी पॅनेल नियमित साफ ठेवा. उत्तम बॅटरी बॅकअप वापरा आणि जास्त वीज खाणारे अप्लायन्सेस दिवसा चालवण्याची सवय लावा, जेणेकरून सोलरचा पुरेपूर वापर होईल.

वाढत्या उन्हाळ्यासोबत आणि बदलत्या जीवनशैलीमुळे सध्या सर्वसामान्यांचे विजेचे बिल गगनाला भिडत आहे. यावर कायमस्वरूपी तोडगा म्हणून अनेक नागरिक घरांवर सोलर पॅनेल बसवत आहेत. मात्र, केवळ सोलर पॅनेल लावण्याने काम पूर्ण होत नाही, तर त्यापासून आयुष्यभर मोफत वीजमिळवण्यासाठी आणि विजेचे बिल पूर्णपणे 'झिरो' करण्यासाठी त्याचे योग्य मेंटेनन्स करणे अत्यंत आवश्यक आहे.

सोलर पॅनेलची क्षमता वाढवण्यासाठी आणि दरमहा येणारा विजेचा खर्च शून्यावर आणण्यासाठी तज्ज्ञांनी 3 अत्यंत प्रभावी आणि स्मार्ट उपाय सुचवले आहेत.

### 3 ते 4 महिन्यांनी साफ करणे

तज्ज्ञांच्या मते, सोलर पॅनेल बसवल्यानंतर त्याची क्षमता टिकवून ठेवण्यासाठी नियमित स्वच्छता हा सर्वात पहिला आणि महत्त्वाचा टप्पा आहे. भारतासारख्या देशात धूळ, प्रदूषण आणि पक्ष्यांची विष्ठा यांमुळे सोलर पॅनेलवर एक थर जमा होतो, ज्यामुळे सूर्यप्रकाश सेल्सपर्यंत पोहोचण्यास अडथळा येतो. टाटा पॉवर आणि जाकसन च्या मेंटेनन्स गाईडनुसार, सोलर पॅनेल दर 3 ते 4 महिन्यांनी नियमितपणे साफ केले पाहिजेत.

### सोलरचे काच फुटण्याचा धोका

नेल साफ करताना नेहमी सकाळी लवकर किंवा संध्याकाळी पॅनेल थंड असतानाच मऊ कापड किंवा मायक्रोफायबर ब्रश आणि साध्या पाण्याचा वापर करावा. कडक उन्हात गरम पॅनेलवर थंड पाणी टाकल्यास थर्मल शॉकमुळे सोलरचे काच फुटण्याचा धोका असतो, तसेच रासायनिक किंवा खरखरीत वस्तूंचा वापर केल्यास पॅनेलवर ओरखडे पडू शकतात.

### सावलीपासून संरक्षण, स्मार्ट मॉनिटरिंग

दुसरा महत्त्वाचा उपाय म्हणजे सावलीपासून संरक्षण आणि स्मार्ट मॉनिटरिंग. सोलर पॅनेलवर आजूबाजूच्या झाडांची किंवा इमारतींची थोडी जरी सावली पडली, तरी संपूर्ण सिस्टमची वीज निर्मिती क्षमता कमालीची घटते. त्यामुळे पॅनेलवर सावली येणार नाही याची खात्री करावी.

### सिस्टीममध्ये बिघाड किंवा घाण

यासोबतच, आजकाल आयओटी (IoT) आधारित मॉनिटरिंग ॲप्स उपलब्ध आहेत, ज्याद्वारे तुम्ही दररोज किती वीज तयार होत आहे याचा अचूक मागोवा घेऊ शकता. वीज निर्मिती अचानक कमी झाल्यास सिस्टीममध्ये बिघाड किंवा घाण असल्याचे त्वरित समजते.

### वीज वापराच्या सवयींमध्ये बदल करणे

तिसरा आणि सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे वीज वापराच्या सवयींमध्ये बदल करणे आणि बॅटरी बॅकअप किंवा नेट मीटरिंगचा योग्य वापर करणे. सध्या भारतात अनेक राज्यांमध्ये 'टाइम ऑफ डे' (ToD) टॅरिफ लागू होत आहे, ज्यामध्ये रात्रीच्या वेळी वीज महाग असते. अशा वेळी, एसी, पाण्याचा पंप, वॉशिंग मशीन किंवा गिझर यांसारखी जास्त वीज खाणारी भारी उपकरणे दुपारच्या वेळी म्हणजेच पीक सोलर जनरेशन दरम्यान चालवल्यास थेट सोलर ऊर्जेचा वापर होतो आणि ग्रीडवरील अवलंबित्व संपते.

### हायब्रिड सोलर सिस्टीम

तसेच, ज्यांच्याकडे हायब्रिड सोलर सिस्टीम आहे, त्यांनी चांगल्या लिथियम बॅटरी बॅकअपमध्ये गुंतवणूक करावी, जेणेकरून दिवसा तयार झालेली अतिरिक्त वीज साठवून ती रात्री वापरता येईल. ऑन-ग्रीड सिस्टीम असलेल्या ग्राहकांनी नेट मीटरिंगचा अर्ज करून अतिरिक्त वीज सरकारला विकल्यास विजेचे बिल थेट शून्य करता येते, असे मिराइ च्या रिपोर्टमध्ये नमूद केले आहे.

नियमित देखभाल आणि या स्मार्ट सवयींचा अवलंब केल्यास सोलर पॅनेल 25 वर्षांपेक्षा जास्त काळ उत्तम कामगिरी देतात.

# उपवासाची आमटी

**साहित्य**- १ वाटी दाण्याचे कूट, ३-४ हिरव्या मिरच्या, २-३ आमसुले, चवीप्रमाणे मीठ, साखर किंवा गूळ, २ लवंगा, १ दालचीनीचा तुकडा.



**कृती**- दाण्याचे कूट थोडे पाणी घालून मिरच्या, लवंगा, दालचिनी यांच्यासोबत पाटयावर किंवा मिक्सरमध्ये वाटून घ्या. नंतर त्यात आणखी पाणी घालून मिश्रण सारखे करा. मीठ, आमसुले व साखर घाला. नंतर आमटी उकळण्यास ठेवा. तुपात जिर्याची फोडणी करुन आमटीत घाला.

**टीप**: आपण आमसुले याऐवजी ताक किंवा दही देखील वापरु शकता.

# चेहरा धुण्याची सोपी पद्धत

**ताजेतवाने दिसण्यासाठी चेहरा स्वच्छ ठेवण्याची गरज असते. पण चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काय, किती आणि कसं वापरायला पाहिजे हे माहिती असणं ही गरजेचं आहे. पाहू चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काही सोपे उपाय:**

### फेसवाश:

चेहरा स्वच्छ आणि टवटवीत ठेवण्यासाठी फेसवाश गरजेचं आहे पण त्वचेच्या प्रकृतीनुरूप योग्य फेसवाश वापरला पाहिजे. हर्बल फेसवाश सर्वात उत्तम. तरीही दिवसातून फक्त दोन वेळा फेसवाश वापरा.

- जरआपण मेकअप करत नसाल तर रात्री झोपण्यापूर्वी फक्त पाण्यानेही चेहरा धुऊ शकता.
- ऑइली स्किनसाठी नीम, कोरफड, आणि मिंट फेसवाश योग्य विकल्प आहे.
- ड्राय स्किनसाठी केसर, मिल्क आणि हनी फेसवाश वापरू शकता.
- डेड स्किनसाठी स्क्रब फेसवाश वापरणे योग्य ठरेल.



### कोमट पाणी:

फेसवाशने चेहरा धुताना पाणी जास्त गरम नसलं पाहिजे याने स्किन खराब होते. त्वेचेसाठी जास्त गार पाणी ही योग्य नाही म्हणून ताज्या किंवा कोमट पाण्याने चेहरा धुवायला हवा.

### घासू नका:

चेहरा जास्त घासण्याने रंग गोरा दिसले हा विचार चुकीचा आहे. असे करणे हानिकारक ठरू शकतं. कारण अशाने त्वचेवरील नरम परत उतरते आणि स्किन कोरडी पडते. तसेच ज्यांना फेस वाइप्स वापरण्याची सवय असते त्यांनीही दिवसातून दोन पेक्षा जास्त वेळा याचा वापर करू नये.

### मेकअप काढा:

मेकअप काढणे अत्यंत आवश्यक आहे. मेकअप काढल्याने त्वचासुद्धा मोकळा श्वास घेऊ शकते.

# गुलाब पाण्याचे फायदे

- गुलाबपाणी दाहक विरोधी गुणधर्मानं परिपूर्ण आहे. त्यामुळं खाज सुटल्यास आणि भाजलेलं असल्यास गुलाब पाणी लावल्यानं दाह कमी होतो.
- चेहऱ्यावरील, त्वचेवरील डाग मिटवण्यास गुलाब पाणी अतिशय लाभदायक आहे. दररोज सकाळी उठल्यावर किंवा रात्री झोपण्यापूर्वी रोझवॉटर आपल्या चेहऱ्याला लावा आणि फरक अनुभवा.
- गुलाब पाणी शॅम्पूनंतर केसांना लावल्यास एक चांगल्या कंडिशनरचा फायदा मिळतो.
- गुलाब पाणी घरगुती ब्युटी पॅक्समध्ये वापरता येतात. त्यामुळं त्वचेला फ्रेश अप करता येतं.



# डार्क सर्कल कमी करण्यासाठी काही घरगुती उपाय

डोळ्याखाली असणारे काळे वलय आपल्या सौंदर्याला ग्रहण लावत असते. हे डार्क सर्कल तणाव, थकवा, कमजोरी तसेच एलर्जीमुळे येत असतो. डार्क सर्कल कमी करण्यासाठी काही घरगुती उपाय-

- चंदन व जैतूनचे तेल एकत्र करून डोळ्या खाली लावल्याने डार्क सर्कल कमी होतात.
- 50-50 ग्रॅम तुळशी, कडूलिंब व पुदिनाच्या पानांना बारीक वाटून लेप तयार करून घ्यावा व त्यात थोडी हळद व गुलाबपाणी घालून एकजीव करावे. हा लेप डार्क सर्कल्सवर लावल्याने आराम पडतो.
- दूधात चिमूटभर मीठ टाकून कापसाच्या बोळ्याने डार्क सर्कलवर लावाल्याने ते नाहीसे होतात.



# पुरण सैल झाले तर काय करावे



- चण्याची डाळ जास्त वेळा चोळून धुवू नये.
- डाळ शिजवण्यापूर्वी दोन तास भिजत ठेवावी.
- कुकरमधून डाळ शिजवताना स्टीलचं भांड वापरा. सरळ कुकरमध्ये पुरण शिजवल्यास काळपट होण्याची शक्यता असते.
- डाळ शिजवताना त्यात चमचाभर तुप घालावं. पुरण लवकर शिजतं आणि चिकटत नाही.
- आपल्या आवडीप्रमाणे डाळ शिजताना त्यात जराशी हळद घालू शकता याने रंग छान येतो.
- डाळीत गुळाबरोबर थोडीशी साखर घातली तर पुरण लवकर शिजतं, चव देखील चांगली येते तसंच पोळी लाटायलाही सोपी जाते.
- डाळीचा कट जास्त पाणी घालून काढू नये याने पुरणाचा स्वाद कमी होतो.
- पुरण शिजवताना त्यात उलथने उभे राहिले की पुरण तयार असल्याचे समजावे.
- पुरण शिजवताना पातेल्यात कड वाळलेली दिसू लागती तसंच खमंग वास सुटला की पुरण तयार झाले समजावे.
- पुरण शिजवताना त्यात वेलदोडा किंवा जायफळपूड न मिसळता पुरण तयार झाल्यावर हे मिसळण्याने चांगली चव येते.
- पुरणात किंचित मिरे घातल्याने पुरणाच्या पोळ्या बाधत नाहीत.
- पुरण सैल झाले असल्यास पोळी तयार करणे अवघड होतं अशात पुरण थोडे गरम करून घट्ट करुन घ्यावे नंतर गार झाल्यावर पोळी छान होते.
- सैल पुरण नॉनस्टीक कढईत घालून मंद आचेवर परतल्याने घट्ट होतं.
- पुरण सैल झाल्यास त्या चिमूटभर सोडा घातल्यानेही पुरण घट्ट होतं.
- पुरण सैल वाटत असल्यास पुराणाला मलमलच्या कपड्यावर पसरुन घ्यावं. याने अतिरिक्त पाणी शोषलं जातं आणि पुरण घट्ट होण्यास मदत होते.

# कॅंसरसारख्या गंभीर आजारापासून बचाव करतो डाळिंबाच्या सालींचा चहा

तुम्ही कधी डाळिंबाच्या सालाच्या चहाबद्दल ऐकले आहे का? हो, खरं आहे डाळिंबाच्या सालींचे देखील चहा तयार करू शकतो आणि त्याचे फायदे जाणून तुम्ही देखील हैराण व्हाल. या चहात उपस्थित बरेच महत्त्वपूर्ण एंटीऑक्सिडेंट्समुळे हे हृदय रोग, बऱ्याच प्रकारचे कॅंसरपासून बचाव करते आणि त्वचेवर वयाच्या प्रभावाला कमी करतो.

### असे तयार करा डाळिंबाच्या सालीचा चहा

डाळिंबाच्या सालीचा चहा तयार करताना सर्वात आधी एका भांड्यात एक कप पाणी गरम करा. आता या पाण्यात एक चमचा डाळिंबाच्या सालीचे पूड घाला. थोड्या वेळ पावडरला पाण्यात तसेच ठेवा. नंतर याला कपात गाळून घ्या. चव वाढवण्यासाठी यात थोडंसं लिंबाचा रस आणि ऑर्गेनिक मध मिसळा.



### या चहा चे फायदे

**पचनासाठी फायदेशीर**

डाळिंबाच्या सालीत उपस्थित बरेच एंटीऑक्सिडेंट्समुळे हा चहा फारच फायदेशीर असतो आणि बऱ्याच आजारांपासून शरीराचा बचाव करतो. जेवण झाल्यानंतर या चहाचे सेवन करणे उत्तम असते.

**गळ्यात खरखर**

जर तुमच्या गळ्यात खरखर असेल किंवा तुम्हाला टॉन्सिलचा त्रास असेल तर या चहाचे सेवन केले पाहिजे. यामुळे तुम्हाला लगेचच आराम मिळेल.

**हृदयाच्या आजारांपासून बचाव**

फ्लेवेनॉइड्स, फेनॉलिक्स सारखे एंटीऑक्सिडेंट्समुळे या चहाचे सेवन केल्याने हृदयाचे आजार कमी होण्याची आशंका असते. या चहाचे सेवन केल्याने तुमचे ब्लड प्रेशर कंट्रोलमध्ये राहत आणि शरीरातील बॅड कोलेस्टरॉलचा स्तर कमी होतो.

**वयाचे प्रभाव कमी होण्यास मदत मिळते**

चहात उपस्थित या एंटीऑक्सीडेंट्समुळे याचे सेवन केल्याने तुमच्यावर वयाचा प्रभाव कमी होतो आणि तुम्ही तुमच्या वयापेक्षा कमी दिसू लागता.हे एंटीऑक्सिडेंट्स फ्री रेडिकल्सला न्यूट्रिलाइज करतात, जसे सुरकुत्या व डोळ्याखालील काळेपणा दिसत नाही.

**संधिवातात फायदेशीर**

हा चहा प्यायल्याने संधी वात आणि हाडांच्या कमजोरीत फायदा मिळतो.

**कॅंसरपासून बचाव**

बऱ्याच शोधामध्ये ही बाब समोर आली आहे की डाळिंबाच्या सालांमध्ये बरेच तत्त्व उपस्थित असतात जे शरीरात कॅंसरच्या आशंकेला कमी करतो. याचा सर्वात जास्त फायदा स्किन कॅंसरमध्ये बघण्यात आला आहे.

# लसीकरणानंतर आठवडाभर कठोर व्यायाम टाळा, हृदयासंबंधी समस्या उद् भवू शकते

**सिंगापूर** सरकारने आपल्या नागरिकांना कोव्हीड -19 लस मिळाल्यानंतर किमान आठवडाभर कठोर व्यायाम किंवा जड काम टाळण्यासाठी सल्ला जारी केला आहे. लसीकरणानंतर जास्त काम केल्याने काही लाभार्थींमध्ये हृदयाचा त्रास उद्भवण्याच्या दृष्टीने सरकारने हे पाऊल उचलले आहे.

**सिंगापूरच्या** आरोग्य मंत्रालयाने सोमवारी सुधारित कोविड -19 मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. यामध्ये, कोरोना लसीचा डोस घेत असलेल्या सर्व लोकांना, विशेषतः 30 वर्षांपेक्षा कमी वयाच्या पुरुषांना, किमान आठवडाभर कठोर शारीरिक श्रम करू नये अशा सूचना देण्यात आल्या आहेत. पूर्वी हा कालावधी 12 ते 24 तासांपर्यंत निश्चित केला गेला होता.



मंत्रालयात एक 16 वर्षाच्या मुलाचा अभ्यास देखील करत आहे ज्याला जिममध्ये वजन उंचावल्यानंतर हृदयविकाराचा झटका आला होता. हृदयविकाराचा झटका कोविड -19 या लसीशी संबंधित आहे की नाही याची चाचणी केली जात आहे कारण लसीकरणानंतर अनेक तरुणांना हृदयविकाराचा त्रास जाणवत आहे. यामध्ये गंभीर मायोकार्डिटिसचा समावेश आहे, ज्यामध्ये हृदयाच्या स्नायू संक्रमणामुळे कमकुवत होते.

# सायकलिंगमुळे रुग्णांच्या प्रकृतीत वेगाने सुधारणा शक्य

**रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांना अतिदक्षता विभागातच सायकलिंगचा (सायकल चालविण्याचा) व्यायाम दिल्यास त्यांच्या प्रकृतीत वेगाने सुधारणा होण्यास मदत होते, असे नुकत्याच करण्यात आलेल्या एका अभ्यासात स्पष्ट झाले आहे.**

**फिजिओथेरपिस्टने** रुग्णांना सावधपणे सायकल चालविण्याचा व्यायाम देण्याची गरज असल्याचे संशोधकांनी स्पष्ट केले. अतिदक्षता विभागातील रुग्ण कोणत्याही प्रकारचा शारीरिक व्यायाम करण्यास असमर्थ असतात, असा सर्वसामान्यांचा समज आहे. मात्र, या रुग्णांना उपचार सुरू असलेल्या कक्षातच सायकल चालविण्याचा व्यायाम दिल्यास त्यांच्या प्रकृतीत निश्चितच सुधारणा होऊ शकते, असे मॅकमास्टर विद्यापीठातील साहाय्यक प्राध्यापक मायकेल कोह यांनी सांगितले. अतिदक्षता विभागातील रुग्णांमध्ये स्नायू कमकुवत होण्याचा धोका मोठा असतो. त्यामुळे स्नायू कायमस्वरूपी निकामी होण्याचा धोकाही संभवतो, असेही कोह यांनी सांगितले. सायकल चालविण्याच्या व्यायामामुळे पाय आणि कमरेचा व्यायाम होतो. त्याच वेळी अतिदक्षता विभागातील आरामामुळे पायाचे स्नायू बळकट होण्यास मदत होते. त्यामुळे रुग्णालयातून सुटल्यानंतरही रुग्ण आत्मविश्वासाने घरी जाऊ शकतात. याचा केवळ रुग्णांना फायदा होणार नसून अतिदक्षता विभागातील आरोग्यसुविधा उंचावण्यासही मदत होणार आहे. गंभीर आजारी असणाऱ्या रुग्णांना रुग्णालयात सायकल चालविण्याचा व्यायाम दिल्यास त्यांच्या प्रकृतीत निश्चित फरक पडेल, असेही संशोधकांनी म्हटले आहे. उपचारादरम्यान रुग्णांना ३० मिनिटे सायकल चालविण्याचा व्यायाम देण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. हे संशोधन पोल्स वन या मासिकात प्रसिद्ध करण्यात आले आहे.



दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)



# गोदावरी महिला विकास प्रतिष्ठान आयोजित विविध वस्तूंचे भव्य प्रदर्शन उत्साहात

## महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी माझा खारीचा प्रयत्न- सौ. उमाताई समशेट्टी

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

महिलांना स्वतःच्या पायावर उभे करून स्वावलंबी बनवण्यासाठी मी खारीचा वाटा उचलण्याचा प्रयत्न करीत आहे. सर्व महिलांनी मला प्रोत्साहन दिले असून आगामी काळातही असेच सहकार्य करावे असे आवाहन गोदावरी महिला विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टी यांनी केले.

गोदावरी महिला विकास प्रतिष्ठानच्या वतीने दोन दिवसीय विविध वस्तूंचा भव्य प्रदर्शन नुकतेच विद्यानगर येथील शंभू महादेव मंदिरात उत्साहात संपन्न झाले. यावेळी त्या बोलत होत्या. या प्रदर्शनात महिलांनी स्वतः बनविलेल्या विविध वस्तू ठेवल्या. या प्रदर्शनाला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सौ. सुरेखाताई मेनकुदळे यांच्या हस्ते झाले. यावेळी न्यू हायस्कूलच्या प्राचार्य सौ. छाया देशमुख, सौ. मंगलताई देशमाने यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोदावरी महिला विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा तथा मुख्य आयोजक सौ. ऊमाताई समशेट्टी होत्या.

महिलांच्या कलागुणांना संधी मिळावी, त्यांच्या हस्तकलेला मार्केट मिळावे या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे सौ. उमाताई समशेट्टी यांनी सांगःतले. आगामी काळातही असेच कार्यक्रम आयोजित करण्याचा आपला मनोदय असुन महिलांनाही सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. या प्रदर्शनात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत मोठा प्रतिसाद दिला. दोन दिवस चाललेल्या या प्रदर्शनाला शहरातील महिलांनी भेटी देऊन विविध वस्तूंची खरेदी करून सहभागी महिलांना प्रोत्साहन दिले. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी सौ. पल्लवी निर्मळे, सौ. अर्चना फुलारी यांचे विशेष सहकार्य लाभले



# परळी तहसील कार्यालयात 'भटका विमुक्त दिन' साजरा न केल्याने संताप

## सचिन भांडे यांची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी**

स्थानिक तहसील कार्यालयामध्ये ३१ ऑगस्ट रोजी साजरा केला जाणारा ऐतिहासिक 'भटका विमुक्त दिन' (मुक्ती दिन) साजरा न केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रशासनाच्या या उदासीन आणि हलगर्जी कारभारामुळे संपूर्ण तालुक्यातील विमुक्त व भटक्या समाजबांधवांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत सामाजिक कार्यकर्ते श्री. सचिन रामभाऊ भांडे यांनी थेट राज्याचे माननीय मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री, भटक्या विमुक्त जाती-जमाती कल्याण मंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करून दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

ऐतिहासिक महत्त्वाचा प्रशासनाला विसर ३१ ऑगस्ट १९५२ रोजी भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भटक्या व विमुक्त जमातींना जाचक आणि अन्यायकारक 'गुन्हेगार जमाती कायदा' (Criminal Tribes Act) या काळ्या कायद्यातून मुक्त केले होते. हा दिवस या वंचित आणि उपेक्षित घटकांसाठी खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य दिन म्हणजेच 'मुक्ती दिन' म्हणून ओळखला जातो.

शासनाच्या स्पष्ट मार्गदर्शक सूचनांनुसार, राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये या दिवशी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करून या ऐतिहासिक दिवसाचे गांभीर्य आणि या घटकांचा सन्मान राखणे बंधनकारक आहे. परंतु, परळी वैजनाथ तहसील कार्यालयाला या महत्त्वाच्या दिवसाचा पूर्णपणे विसर पडल्याचे



दिसून आले.

समाजबांधवांच्या भावना दुखावल्यातक्रारदार सचिन भांडे (रा. संत तुकाराम नगर, परळी वैजनाथ) यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, ३१ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारचा शासकीय कार्यक्रम किंवा या दिवसाचे औचित्य साधणारे साधे अभिवादनही करण्यात आले नाही. प्रशासनाची ही भूमिका अत्यंत खेदजनक असून, यामुळे परळी वैजनाथ तालुक्यातील तसेच संपूर्ण बीड जिल्ह्यातील विमुक्त व भटक्या जमातींमधील नागरिकांच्या आणि समाजबांधवांच्या अस्मितेला व स्वाभिमानाला ठेच पोहोचली आहे. उच्चस्तरीय चौकशी व कारवाईची मागणीप्रशासकीय स्तरावर अशा महत्त्वाच्या सामाजिक आणि ऐतिहासिक दिवसाची दखल न घेतली जाणे ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी सचिन भांडे यांनी केली आहे. तसेच, या अक्षम्य चुकीसाठी जबाबदार असणारे अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कडक प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.

भविष्यात कोणत्याही शासकीय कार्यालयात अशा राष्ट्रीय व सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या दिवसांचा अवमान होणार नाही, यासाठी शासनाने प्रशासनाला कडक निर्देश द्यावेत, अशी आग्रही मागणी या तक्रारीद्वारे करण्यात आली आहे. निवेदन देण्यासाठी दत्तात्रय दुंदुले,दीपक सुपले,दीपक जोशी,कुणाल चाटे,ज्ञानेश्वर अंबुरे,वैजनाथ मुळे आदी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. या प्रकरणी आता शासन आणि जिल्हा प्रशासन काय पावले उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पै.सुमितकुमार भारस्कर जागतिक कुस्ती स्पर्धेसाठी भारतीय संघात

**वार्ताहार मारुंजी पुणे**

२३ वर्षाखालील जागतिक कुस्ती स्पर्धा अमेरिकेतील लास वेगास येथे दिनांक १२ ते १८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होणार आहेत. या स्पर्धेचे आयोजन जागतिक कुस्ती संघटना (uww) यांच्या मार्फत करण्यात आले आहे. जागतिक स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी भारतीय कुस्ती संघाची निवड चाचणी भारतीय कुस्ती महासंघ यांनी साई कुस्ती प्रशिक्षण केंद्र लखनौ येथे दिनांक ०१ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित केली. यामध्ये पै.अमोल बुचडे कुस्ती अकादमीचा पैलवान सुमितकुमार भारस्कर याने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत ७० किलो फ्री स्टाईल वजन गटात सहभाग घेतला. निवड चाचणीमध्ये सुमितकुमारची प्रथम कुस्ती हरियनाच्या रिन्कू कुमार विरुद्ध २-३ गुण फरकाने जिंकली. अंतिम कुस्ती दिल्लीच्या सिद्धार्थ विरुद्ध ५-१६ गुण फरकाने एकतर्फी जिंकून भारतीय संघात आपले स्थान पक्के केले आहे. सुमितकुमार याने यापूर्वी थायलंड येथे झालेल्या आशियाई चॅम्पियनशिप स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केले आहे. जागतिक कुस्ती स्पर्धा ब्राटीस्लाव्हा स्लोव्हाकीया येथे भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. अनेक राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदक प्राप्त केली आहेत. सुमितकुमार पै. अमोल बुचडे कुस्ती अकादमी मध्ये मागील सहा वर्षापासून सराव करत आहे. महाराष्ट्र केसरी तथा रुस्तम ए हिंद पै. अमोल बुचडे यांच्या तंत्रशुद्ध, कलात्मक डावपेचांच्या शिकवणीतून हा प्रतिभावान खेळाडू तयार होत आहे. जागतिक स्पर्धेच्या तयारीसाठी भारतीय कुस्ती संघाचे सराव शिबिर अखिल भारतीय कुस्ती महासंघाच्या वतीने भारतीय खेळ प्राधिकरण (साई) लखनौ येथे सुरू आहे. सुमितकुमार जागतिक कुस्ती स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करून देशासाठी पदक प्राप्त करील,




अशी अपेक्षा वस्ताद अमोल बुचडे यांनी व्यक्त केली. सुमितकुमारची जागतिक कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल पै.अमोल बुचडे, प्रा.किसन बुचडे, पै.विनोद गोरे, पै.समीर देसाई, पै.उत्कर्ष काळे, कोच नरेंद्र कुमार, अनिराज सुभेदार, हितेंद्र कांबळे, मिलिंद झोडगे, पै.महेश घुले, प्रा संतोष पवार, कपिल बुचडे यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
• बीड, शुक्रवार, 4 सप्टेंबर 2026

## जिंतूर येथे JCB ब्रेकर चोरीचा गुन्हा उघडकीस: तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे ७ आरोपींना कर्नाटकातून ठोकल्या बेड्या!

जिंतूर (विशेष प्रतिनिधी):

जिंतूर पोलीस स्टेशन हद्दीत घडलेल्या जेसीबी ब्रेकर (JCB Breaker) चोरीच्या गुन्ह्याचा उलगडा करण्यात स्थानिक गुन्हे शाखा (LCB) व परभणी पोलिसांना मोठे यश आले आहे. अत्यंत गुप्त व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी आंतरराज्यीय कारवाई करत या गुन्ह्यातील ७ आरोपींना कर्नाटक राज्यातील विजापूर येथून ताब्यात घेतले आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी एकूण ₹८४,१५,००० (चौरंशी लाख पंधरा हजार) रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

विविध जिल्ह्यांतील उघडकीस आलेले गुन्हे:

पोलीस तपासात या टोळीने इतर ठिकाणी केलेले चोरीचे गुन्हे देखील निष्पन्न झाले आहेत:

१. पोलीस स्टेशन जिंतूर (जि. परभणी) – CR No. 384/2026, कलम 303(2) BNS

२. पोलीस स्टेशन वडवणी (जि. बीड) – CR No. 577/2026, कलम 303(2) BNS

३. पोलीस स्टेशन बिडकीन (जि. छत्रपती संभाजीनगर) – CR No. 546/2026, कलम 303(2) BNS

एकूण जप्त करण्यात आलेला मुद्देमाल (₹८४,१५,०००/-

०४ JCB ब्रेकर: किंमत ₹४८,००,०००/-

०१ JCB मशीन: किंमत ₹२५,००,०००/-

०१ महिंद्रा पिकअप वाहन: किंमत ₹५,००,०००/-

०१ Renault Duster कार: किंमत ₹५,००,०००/-

०१ Discover मोटारसायकल: किंमत ₹५०,०००/-

०६ मोबाईल फोन: किंमत ₹६५,०००/-

ताब्यात घेण्यात आलेले आरोपी (सर्व रा. गेवराई, जि. बीड):

१. जगन्नाथ किषन काळे (वय ४७, व्यवसाय शेती, रा. राजपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड)

२. दत्तात्रय नारायण जाधव (वय ३५, व्यवसाय शेती, रा. राजपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड)

३. नामदेव भगवान जाधव (वय ५५, व्यवसाय शेती, रा. राजपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड)

४. सोमेश्वर मनोहर शेम्बाडे (वय ३८, व्यवसाय ड्रायव्हर, रा. गेवराई, जि. बीड)

५. किशोर लहू खंडागळे (वय ३०, व्यवसाय वायरमन, रा. गेवराई, जि. बीड)

६. रामेश्वर दिलीप पांगरे (वय २७, व्यवसाय JCB ऑपरेटर, रा. कुंबेजळगाव, ता. गेवराई, जि. बीड)

७. अमोल अंकुश पवार (वय २८, व्यवसाय शेती, रा. संजय नगर, गेवराई, जि. बीड)



तपास पथकाची कामगिरी:

सदर धडक कारवाई परभणीचे पोलीस अधीक्षक श्री. पंकज कुमावत (भा.पो.से.) आणि अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक श्री. गजेंद्र सरोदे, पोउपनि श्री. गणेश सवंडकर, पोलीस अंमलदार श्रेणी पोलीस उपनिरीक्षक मधुकर चट्टे, सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ, मुकेश बुधवंत, विलास सातपुते, पांडुरंग तूपसुंदर, उमेश चव्हाण आणि उत्तम हनवते यांच्या पथकाने शास्त्रोक्त व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींना शिताफीने कर्नाटकातून गजाआड केले.

## वैद्य अमोल बाबासाहेब धोंडे यांना वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रांतून शुभेच्छांचा वर्षाव

आष्टी (प्रतिनिधी):

ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. बाबासाहेब धोंडे यांचे सुपुत्र तसेच 'श्री विश्वकांत आयुर्वेदिक चिकित्सालय व पंचकर्म केंद्र'चे संचालक वैद्य अमोल बाबासाहेब धोंडे (आयुर्वेदाचार्य) यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून स्नेहमयी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी श्री संदीप धोंडे सर, सुरज शिंदे सर व निलेश ढगे यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन वैद्य अमोल धोंडे यांचा सत्कार केला व त्यांना निरोगी, दीर्घायुषी जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

वैद्य अमोल धोंडे हे आष्टी येथील शनी चौक परिसरातील जयभोले कॉम्प्लेक्समध्ये 'श्री विश्वकांत आयुर्वेदिक चिकित्सालय'च्या माध्यमातून आयुर्वेद, पंचकर्म व योगाच्या साहाय्याने रुग्णांची अविरत सेवा करत आहेत. त्यांच्या या आरोग्य सेवेचा गौरव करत विविध सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रांतील मित्रपरिवारानेही त्यांच्यावर दूरध्वनी व प्रत्यक्ष भेटीतून शुभेच्छांचा वर्षाव केला.



## देऊळगाव घाट ची लेझीम परंपरा : एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित

देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)

देऊळगाव घाट तालुका आष्टी जिल्हा बीड येथील लेझीम परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित झाली.संस्कृतीचा वारसा आपली लोककला, परंपरा आणि संस्कृती जपली गेली तरच पुढील पिढी आपल्या मातीशी आणि संस्कारांशी जोडलेली राहते. याच विचाराचे सुंदर उदाहरण म्हणजे देऊळगाव घाट येथील लेझीम पथकाचा आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम.देऊळगाव घाट तालुका आष्टी जिल्हा बीड,मध्ये लेझीम कला केवळ सण-उत्सवा पुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जपून हस्तांतरित केली जात आहे. गावातील लहान मुलांना दररोज एक तास लेझीम कलेचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणातून मुलांना केवळ लेझीमचे डावपेच शिकवले जात नाहीत, तर शिस्त, एकता, सांघिक भावना, वेळेचे महत्त्व आणि आपल्या सांस्कृतिक वारशा बद्दल अभिमानही शिकवला जातो.विशेष म्हणजे, आजच्या आधुनिक युगातील तरुण पिढीही या उपक्रमात उत्साहाने सहभागी होत आहे. मोबाईल आणि विविध आधुनिक मनोरंजनाच्या माध्यमांमध्ये रमणाऱ्या आजच्या तरुणांनी ही आपल्या पारंपरिक कलेसाठी वेळ देणे ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. दररोज संध्याकाळी साडेसात ते साडेआठ या वेळेत तरुण मुले एकत्र येऊन लेझीम चा सराव करतात. ताल, लय आणि एकसंध हालचालींनी



गावाचे वातावरण उत्साहाने भरून जाते.देऊळगाव घाट चा हा उपक्रम केवळ एक कला प्रशिक्षण केंद्र नाही, तर तो पिढ्यांना जोडणारा संस्कृतीचा सेतू आहे. ज्येष्ठांच्या अनुभवातून आणि तरुणांच्या उत्साहा तून ही परंपरा अधिक समृद्ध होत आहे. आज शिकणारी मुले उद्या याच कलेचे शिक्षक बनून पुढील पिढीला हा अमूल्य वारसा देणार आहेत.देऊळगाव घाट ने सुरू केलेला हा आगळावेगळा उपक्रम निश्चितच इतर गावांसाठी आदर्श घेण्यासारखा आहे. प्रत्येक गावाने आपल्या स्थानिक कला, परंपरा आणि सांस्कृतिक वारशाचे असेच जतन केले, तर आपली लोकसंस्कृती अधिक समृद्ध आणि जिवंत राहील.देऊळगाव घाट ची लेझीम परंपरा ही केवळ तालावर होणारी कला नाही; ती गावाची ओळख, संस्कृतीचा अभिमान आणि पिढ्यांना एकत्र बांधणारा सुंदर वारसा आहे."आजची मुले शिकत आहेत, आजचे तरुण जपत आहेत आणि उद्याची पिढी ही परंपरा अभिमानाने पुढे नेणार आहे — हाच देऊळगाव घाटच्या लेझीम पथकाचा खरा गौरव आहे."

देऊळगाव घाट च्या लेझीम पथकाने आळंदी मध्ये माऊलीच्या सोहळ्यात माऊलीच्या रथासमोर लेझीम खेळण्याचा मान लेझीम पथकाला मिळाला. ही एक देऊळगाव घाट साठी अभिमानाची बाब आहे.

## कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धानोरा येथे 1001 वृक्षांचे वृक्षारोपण

### महाराष्ट्र भूषण माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धनाचा अनोखा उपक्रम

प्रतिनिधी - सोपान पगारे

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षसंवर्धनाची गरज दिवसेंदिवस वाढत असताना कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धानोरा (ता. आष्टी) येथे १००१ वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. महाराष्ट्र भूषण तथा माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून हा पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस एन वाघुले यांनी यावेळी सांगितले की, या वृक्षारोपण उपक्रमातून महाविद्यालय परिसर अधिक हिरवाईने नटविण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. वाढते प्रदूषण, बदलते हवामान, कमी होत चाललेले वनक्षेत्र आणि पाण्याची समस्या या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे ही काळाची गरज असल्याचे सांगत महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पर्यावरणप्रेमी नागरिकांनी वृक्षारोपण मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या प्रत्येक रोपाची नियमित देखभाल करून ते मोठे करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वीकारावी, असे आवाहन ही प्राचार्य डॉ वाघुले यांनी यावेळी केले.

महाराष्ट्र भूषण भीमराव धोंडे यांच्या पर्यावरण संवर्धनाच्या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत महाविद्यालयाने १००१ वृक्षांची लागवड केल्याने परिसरात या उपक्रमाचे कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचवून आपल्या परिसरातही जास्तीत जास्त वृक्षलागवड करावी असे आवाहन प्राध्यापक राजू शेलार यांनी यावेळी केले.

यावेळी प्रा निसार शेख यांनी 'एक विद्यार्थी–एक झाड' या भावनेतून विद्यार्थ्यांनी वृक्षांचे संगोपन केल्यास भविष्यात महाविद्यालय परिसर हिरवाईने फुलून येईल आणि पुढील पिढीसाठी स्वच्छ व निरोगी पर्यावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस एन वाघुले,प्रा. गहिनीनाथ एकशिंगे, प्रा. राजू शेलार, प्रा विवेक महाजन, प्रा आजिनाथ गिलचे, प्रा सुभाष मोरे, प्रा आतेश बनसोडे, प्रा शबाना शेख, प्रा जयश्री बोडखे, प्रा ज्ञानदेव बोडखे, प्रा सतीश तागड, प्रा बालशंकर, प्रा संजय झांजे, प्रा वाळके तसेच शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. १००१ वृक्षांच्या लागवडीमुळे धानोरा परिसरात पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेश गेला आहे.

